**लावणीतील वर्णन** - जिच्या कमरेला लोळणारे नागिण (वेणी)
हिऱ्या सारखे तेजस्वी दात
माणका सारखे लाल चटक ओठ
आपणासु नाही चंद्रेखाला फिका

**उत्प्रेक्षा अलंकार** - सूर्यास्त वर्णन -
जलाशयाकडे जाणारा सूर्य पहा पोवळ्याच्या मंदीरात तेजस्वी राजु शंकराने पोळलेला मदन थंडाईसाठी पश्चिम समुद्रात शिरत आहे प्रकाशाच्या गोळाच घरंगळत चालला आहे

**सायंकाळचे वर्णन** - सायंकाळ होताच सूर्यविकासी कमळ मीटली प्रियांशीना विरहात चक्रवाक पक्षी व्याकूळ झालेत सारे रसो फुलांना गुंजारव करणे आहे नगरात वाद्यांचे घोष नृत्य गायनाची आराधना

**अत्युक्ती** - लावणीने सुरेखास निरोपाचा विडा पान हाती घेताच ती करून गेली आणी कात्रर विडा हाती घेताच हातातून ज्वाळा निघाल्या त्या ज्वाळांनी जाळीतेच लावणीने ओढणीला आवळले.

**उपमा** - उपमा अलंकाराही सर्वत्र योजिलेला आहे त्यातील शब्द सौंदर्य पाहण्यासारखे आहे.

काश्मिराचिये कंराडिये जैसे;
भीतरीलि मूर्ति प्रकाशे
आवडेचि दीसतानी ॥

કવિની રચના સર્ગબદ્ધ નથી તેથી સંસ્કૃત મહાકાવ્યોના આદર્શ ડોળ્યા સમોર આમાવેલ. અતિશયોક્ત વર્ણનાત્મક યા ગ્રંથોને કાવ્ય સૌંદર્ય નિષ્ફળ ગયું છે. રુક્મિણીના વિરહને વર્ણન કરનાર તેના માનસિક આવેગ અવસ્થાનું ચિત્રણ કરવાનેવણી તેના આરંભી નિર્ણય કેળવ્યા શૃંગારહાસ લાગી, રંગરા ર શિતનમોને ચંડીને વાકડનારા સૂર્ય આવ્યા આકાર ગોળીને વર્ણન કરતો. રુક્મિણીના વિરહોચ્ચારા આવી તેના મૈત્રીની જે જે પ્રયત્ન કરનાર યાદી અતિશયોક્ત વર્ણન આવે છે

રાજાની વર્ણન

<u>નાયક</u> <u>નાયિકાઓનું</u> સ્વરૂપ વર્ણન

સૂર્યાસ્ત - ચંદ્રોદય વર્ણન

સંધ્યાકાળના અંધાર, દ્વારકાનગરી, દિવસનું વર્ણન

વનોપવન. નગર પ્રવેશ. ઉપર વર્ણન

હરિકૃપાભક્તોને નિરખવા ભરી કવીને કોઈ અસર નથી. પંથીય તત્વજ્ઞાન માટે આ ગ્રંથને કોઈ જ આપેલ નથી.

'रुक्मिणी स्वयंवरा'च्या प्रारंभी नरेंद्राने श्रीगणेश व शारदा (3)
यांना वंदन केले. शारदेच्या कृपादृष्टीमुळे महाकवींच्या वाणीवर नवरसमेघांची वृष्टी होते. तिच्या कृपेच्या प्रकाशात त्यांची वाणी प्रवाहित होते. पण त्यात उत्कृष्टपणे रंगणाची भर पडली तर कवित्वाच्या काव्यातील अनेक सौंदर्य स्थळे दिसून येतात.

"कविकुळाच्या वाणीचा कीर्तिचंद्र : पश्चिमेचा उत्कर्षाचा समुद्र"

आनंद ही त्यांच्या काव्यनिर्मितीमागची प्रेरणा आहे पण त्यांनी भक्ताची भूमिका सोडली आहे असे मात्र नाही

जेथे श्री परमेश्वर भवानीचे पाड : ते हेचि हे कथा अमरगोड
तेथे काहीच नाही अवघड : जन्म मरणांचे

अशी कृष्णकथा वाचणाऱ्याची फलश्रुती त्यांनी सांगितली.

नरेंद्राच्या या रुक्मिणी स्वयंवरातील कथा भागवतातील दशम स्कंध आधारल्याचे कवी स्वतः सांगतात

तो पुराणांतुल आनंद समुद्र :
तेथ दशमस्कंध तोचि चंद्र
ते चांदणे सांघेन म्हणे नरेंद्र
रुक्मिणी - स्वयंवर :

ही कथा मूळ भागवतातून घेतली असली तरी कवीने त्यात अनेक बदल केले आहेत कल्पनाविलास व विस्तार मूळ भागवतात नाही. त्याच प्रमाणे रुक्मिणीची विरहावस्था प्रीत स्वयंवरानंतर निर्माण केलेले सोहळे लोकाचारही भागवतात नाही. भागवतात विश्वासू ब्राह्मण म्हणून उल्लेख आहे, तर नरेंद्राने 'सुदेव' ब्राह्मण असे नामकरण केले.

नरेंद्र हा रामदेवराव यादव दरबारातील कवी यांच्या दोन बंधूंनी (साळ व नृसिंह कवी यांनी) रामायण व नळोपाख्यान लिहिलेले पाहून श्रीकृष्ण भक्त नरेंद्राने त्यांची निर्भत्सना केली. तेव्हा दोघा बंधूंनी नरेंद्रास श्रीकृष्ण कथेवर काव्यरचना करण्याचे आवाहन केले ~~[illegible]~~ ~~[illegible]~~ या आवाहनातून 1800 ओव्यांच्या 'रुक्मिणी स्वयंवराचा' जन्म झाला. हा ग्रंथ ~~[illegible]~~ (इ.स. 1292/श. 1214) हे काव्य रामदेवरायास इतके आवडले की 'हा ग्रंथ आपल्या नावावर केल्यास आपण तुला प्रत्येक ओवीस सोन्याचा टक्का देऊ.' असे आमिष दाखवून तो त्यावर हक्क सांगू लागला. 'असे केल्यास आमच्या कविकुळास कलंक लागेल' असे स्पष्ट उत्तर देऊन स्वाभिमानी नरेंद्र परतला. त्या रातीत होडीने तेवढा ग्रंथ (अर्धे काव्य सुमारे 900 ओव्या) वाचवून तो [illegible] आला व त्याने पंथाची दीक्षा घेतली.

## कथाबीज

विदर्भात कौंडिण्यपूर नगरात भीमक नावाचा सर्वगुणसंपन्न राजा राज्य करीत होता. रुक्मी, रुक्मबाहु, रुक्मरथ, रुक्मेश व रुक्ममाली सहावी रुक्मिणी नावाची मुलगी ती रूपाने अतिशय सुंदर व ती शास्त्रे व नृत्य ही शिकली होती. भीमकाला आपल्या मुलीच्या लग्नाची चिंता लागली होती. त्यांनी ही चिंता प्रधानाजवळ बोलून दाखविली. कल्याणकीर्ति व किन्नर जेव्हा दरबारात आले तेव्हा रुक्मिणी दरबारात होती. अनेक राजांचे वर्णन ऐकल्यावर ~~[illegible]~~ रुक्मिणीला काहीच वाटले नाही. श्रीकृष्णाचे वर्णन चालू झाल्यावर ती देहभान विसरली. तिला श्रीकृष्णाचा वेध लागला आहे हे भीमकाच्या लक्षात आले पण मोठा मुलगा रुक्मी हा श्रीकृष्णाचा कट्टर शत्रू असल्याने त्याने विरोध दर्शविला. आपल्या भावाचा विरोध होताच ~~[illegible]~~ नाराज झाली पुढे सुदेव ब्राह्मण नावाच्या आपल्या गुरुजनवत् एक गुप्त पत्र लिहून पाठविले.

Scanned with OKEN Scanner

# महानुभवांचे पद्य वाङ्मय (साती ग्रंथ) ①

## ① रुक्मिणीस्वयंवर - नरेंद्र

* उत्कृष्ट प्रेम कविता हा या कथेचा विषय
* रामायण महाभारत हे आर्ष महाकाव्य होय (आर्ष म्हणजे - ऋषीमुनींनी रचलेले
* महाकाव्यात जीवनाचे व्यापक दर्शन असते
* एकनाथांनी सुद्धा रुक्मिणीस्वयंवराची कथा लिहिली (काही येथे)
* आख्यान काव्य - आगड पगड गोष्ट भक्ती भावनेशी निगडीत पुराणातील गोष्ट असतात हा वाचक सर्वसामान्य साय - वरील असावा असा दृष्टिकोन (उदा. श्रीधराचे शिवलीलामृत
* महाकाव्य - याचा जोर कमी असतो. कथात्मक स्वरूप स्वतःच्या प्रतिभेने स्वरूप प्राप्त करून देत. कथेत नसलेले पात्र त्यात समाविष्ट असतात
* पंडित काव्य - ~~आख्या~~ आख्यान काव्य व महाकाव्य या दोन्हींची किमया यात सुद्धा रामायण व महाभारत यात येतात पण लेखकांनी आपले पांडित्य मांडले (नागेश, पिंडकर) ज्ञानचे ~~किती~~ शब्दावर प्रभुत्व आहे हे दाखविण्यासाठी (मोरोपंत रघुनाथ पंडित - नल दमयंती स्वयंवर

कवी–नागनाथ विठ्ठलराव गायकवाड
21, भैरूवस्ती, लिमयेवाडी, वांगी रोड,
सोलापूर. मो. नं. 9850280836

## क्रांतिकारी बाबू बरगुडेचा पोवाडा

*भडकली क्रांतिची ज्योत हर एक हृदयात ।क्रांतिवीर बाबू बरगुडे मनगोळी ग्रुपात ।*
*बेभान होऊन लढला भारत स्वातंत्र्यात । अन् संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या गोळीबारात गेला बलीदान ।। जी ।। धृ ।।*

क्रांतिचा तुफान उठले । क्रांतिसिंह नानापाटील पुढारी आपुले । विजापुरचा मनगोळी ग्रुप पत्रि–सरकारच्या संगतीला । विजापूर ग्रुपचा प्रमुख केले होते मनगोळी मास्तरला। शेर नाना पाटीलानी डरकाळी फोडिला।इंग्रजांची जुलमी सत्ता उखडू आता । हाती घ्यारे बंदूका आता । प्रतिसाद देऊन सारा प्रांत जागला । घरदार सोडून नाना पाटलाकडे धावला । क्रांतिचा यज्ञ सुरु झाला ।। जी ।१ ।।

*भडकली क्रांतिची ज्योत हर एक हृदयात ।क्रांतिवीर बाबू बरगुडे मनगोळी ग्रुपात ।*
*बेभान होऊन लढला भारत स्वातंत्र्यात । अन् संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या गोळीबारात गेला बलीदान ।। जी ।। धृ ।।*

क्रांतिसिंह नाना पाटलांची पत्री सरकार सेना । निघे भरधाव क्रांतिच्या कार्यांना,। लूटूनी सरकारी खजिना, शस्त्रे जमविली नाना,। आगी लावल्या कोर्ट कचेऱ्यांना,। इंग्रजांची उडविली दैना। पत्री सरकारचे मनगोळीग्रुपमध्ये क्रांतिवीर बाबू बरगुडे नाना,देश स्वातंत्र्यासाठी लढला ।।जी ।।२ ।।

*भडकली क्रांतिची ज्योत हर एक हृदयात ।क्रांतिवीर बाबू बरगुडे मनगोळी ग्रुपात ।*
*बेभान होऊन लढला भारत स्वातंत्र्यात । अन् संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या गोळीबारात गेला बलीदान ।। जी ।। धृ ।।*

क्रांतिसिंह नाना पाटलांनी हाक दिली । शिववाच्या मावळ्यांनो थोपटा दंड,। चला करु आता फिरंग्याशी बंड,। निपटून काढूत अन्याय, नमकहरामाला करु जायबंद,। क्रांतिचा वणवा पेटला, ब्रिटिश सत्ता हादरीला,। स्वराज्य द्याया फिरंगा तयार झाला,। देशासाठी केले ज्यांनी बलीदान । हुतात्मे झाले देऊनी प्राण । शाहिरी मुजरा त्या क्रांतिविरांना ।।जी ।। ३ ।।

*भडकली क्रांतिची ज्योत हर एक हृदयात ।क्रांतिवीर बाबू बरगुडे मनगोळी ग्रुपात ।*
*बेभान होऊन लढला भारत स्वातंत्र्यात । अन् संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या गोळीबारात गेला बलीदान ।। जी ।। धृ ।।*

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला। पुनश्च संयुक्त महाराष्ट्र चळवळ पेटला,। विजापूरचा मनगोळी ग्रुप मुंबईत चळवळीत सामील झाला। मुंबई इलाखा सरकारचा गोळीबाराचा आदेश झाला। १५६-चळवळ धारक जागीच हुतात्मा झाला। क्रांतीकारकांचा देह बेवारस सडला। बाबू बरगुडेचा सडलेला देह बरगुडी गावी आणून गूपचूप जाळला।ऐशी क्रांतिकारकांची,चळवळ-धारकांची विकट झाली दशा,। देशासाठी वाहिला प्राण । क्रांतीकार्यासाठी काया मिटली,। पणतू नागनाथ गायकवाडानी क्रांतीकाव्य रचली,। शाहिर.................................... यांनी पोवाडा गायली । ।जी । ।४ ।।

*भडकली क्रांतिची ज्योत हर एक हृदयात ।क्रांतिवीर बाबू बरगुडे मनगोळी ग्रुपात ।*
*बेभान होऊन लढला भारत स्वातंत्र्यात । अन् संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या गोळीबारात गेला बलीदान ।। जी ।। धृ ।।*

Scanned with OKEN Scanner

# ३१ ऑगस्ट हा माजी गुन्हेगार जमातींचा मुक्तीचा दिन - विमुक्तदिन

ब्रिटिशांची गुलामगिरी झिडकारुन , ब्रिटिश सत्तेच्या विरोधात बंड, चळवळ पुकारुन, गनिमीकाव्याने लढणाऱ्या भिल्ल व आदिवासी वर्गीयामधील लढवय्ये टोळ्या- जमातीवर ब्रिटिश सरकारने १८७१साली गुन्हेगार जमात कायदा करुन हया लढवय्या जमातीवर गुन्हेगारीचा शिक्का लादला.

ब्रिटिश आणि मनुवादी व्यवस्थेने हात मिळवणी करुन , कुटनिती कारस्थानाने ब्रिटिश सत्ते विरुध्द लढणाऱ्या अनेक आदीवासी - भिल्लवर्गीय जमातींना, गुन्हेगार ठरवून सेटलमेंटच्या तुरुगात खितपत ठेवले. या कायद्याने पूर्वजांचे वंशजावर गुन्हेगार ठरवून, जन्मतः - गुन्हेगारीचा शिक्का मारण्यात आला. जन्माने गुन्हेगार ठरविण्यांत आला गुन्हा न करताही गुन्हेगार ठरविण्यात आला. आईच्या गर्भात - वाढणारा बाळही गुन्हेगार म्हणून जन्मतो. असा माणुसकिला काळीमा फासणारी कायदा ब्रिटिशांनी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या जमातीवर लादला. स्वातंत्र्य मिळवून देणारी जमात, अजुनही [redacted] हया कायद्याच्या जात्याखाली गुन्हा न करताही भरडला जातोच आहे.

ब्रिटिश सरकारने १९२४साली गुन्हेगार जमाती वसाहतीकरण कायदा करुन या गुन्हेगार जमातीवर कडक निर्बंध लादले. काटेरी तारेच्या तिन कुंपणाचे आत व पोलीस पहाऱ्यात त्यांना डाबून ठेवले. **स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वरील दोन्ही कायदे ३१ ऑगस्ट १९५२रोजी भारत सरकारने रद्द केले.** *पंडित जवाहरलाल नेहरुनी गुन्हेगार जमातींची सेटलमेंटच्या काटेरी तारेतून मुक्तता केली.आदीवासी - भिल्लवर्गीय गुन्हेगार जमातींना मुक्तीचा दिन म्हणून ३१ ऑगस्ट या दिनाला विशेष महत्व आहे.* आज तुम्हाला मी मुक्त करीत असल्याने तुम्ही विशेष मुक्त आहात. म्हणून तुम्हाला आजपासून विमुक्त नावाने संबोधण्यात येईल. असे पंडित नेहरुनी भाषणात म्हणाले होते. म्हणून सेटलमेंटच्या **काटेरी तारेच्या कुंपणातून मुक्त केलेल्या आदिवासी भिल्ल वर्गीयामधील लढवय्ये असलेल्या, गुन्हेगार-आदीवासी वर्गीय जमातींना, विमुक्त - जमाती असे संबोधण्यात येवू लागले.** यामुक्त केलेल्या जमातींना घटनेने आरक्षण दिलेल्या अनुसुचीत जाती जमाती मध्ये समावेश करुन त्यांचे पुर्नरवसन करणे आवश्यक होते. तसे करणे सहज शक्य होते. ते आजतागायत न करता संविधानिक आरक्षणापासून गुन्हेगार जमातीस वंचीत ठेवण्यात आलेले आहे. या जमातींना तारेच्या कुंपणातून मुक्त करुन खुले सोडुन देण्यात आले.[redacted]. गुन्हेगार जमातींना विमुक्त असे संबोधले जाऊ लागले. म्हणून ३१ आगस्ट हा दिन विमुक्तदिन म्हणून गुन्हेगार जमातीचे वतीने साजरा करण्यांत येतो. विमुक्त दिन म्हणजे हया गुन्हेगार जमातींचा मुक्तीचा दिन म्हणजेच स्वातंत्र्याचा दिनच आहे.।

विमुक्त जमाती म्हणजेच गुन्हेगार जमाती, अनेक वर्षापासून आजपर्यंत उपेक्षित, दुर्लक्षित, अस्थिर आणि असुरक्षित अवस्थेत, अज्ञान, रुढी- परंपरा, अंधश्रध्दा अगतिकता अशा या सा-या दुष्ट चक्रात भरडल्या जात आहेत. स्वातंत्र्याची ७० वर्षानंतरही विमुक्त गुन्हेगार जमातींचे अनुसुचीत जमातीचे यादीत समावेश केलेले नाही. विमुक्त गुन्हेगार जमात ठरविलेल्या जमाती हया मुळ भिल्ल, आदिवासी वर्गीयच आहेत. इतर राज्यात तसा समावेश करण्यांत आलेले आहे. पण महाराष्ट्रात राज्यातच हया जमाती उपेक्षित राहिलेल्या आहेत. या जमातीसाठी नेमण्यात आलेल्या आयोगात गुन्हेगार जमातीचा इतिहास माहित नसलेले, पुर्ण अभ्यास नसलेल्या लोकांचा भरणा असल्याने हया गुन्हेगार जमातीस अनुसचीत जमातीचे यादीत समावेश करण्याबाबत कार्यवाही करु शकले नाहीत. आयोगावर आयोगाची निर्मीती म्हणजे निव्वळ वेळ काढू धोरण राबविणेचे कार्यक्रमच ठरत आहे. विमुक्त गुन्हेगार जमातींचा स्वातंत्र्यातील सहभागाचा इतिहास समजून घेतल्यास, गुन्हेगार जमाती हया मुळच्या कोण आहेत. याचा अभ्यास केल्यास ते न्यायाचे ठरणारे आहेत.

सन १८५७ च्या देशाच्या स्वातंत्र्याच्या उठावामध्ये अनेक देशभक्तांनी संघर्ष केला. त्यामध्ये भिल्ल आदिवाशी वर्गीय गुन्हेगार जमाती म्हणजेच भटक्या विमुक्त जमाती मधील तरुण मागे नव्हते. ब्रिटिशांचे विरोधात बंड चळवळ करीत असल्याने, ब्रिटिशांनी या जमातीवर गुन्हेगार असा शिक्का मारलेले आहे. हा इतकाच पुरावा भारतदेश स्वातंत्र्यातील हया गुन्हेगार जमातीचे योगदानाचा मोलाचा आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. पण देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे आदीवासी भिल्लवर्गीया मधील लढवय्ये यांना गुन्हेगार जमात संबोधलेल्या जमातींना ब्रिटिशांच्या तारेच्या कुंपणातील जेलमधून ३१ ऑगस्ट १९५२ रोजी मुक्त करण्यात आले. म्हणजे स्वातंत्र्यासाठी लढलेल्या, ब्रिटिशांनी गुन्हेगार जमात संबोधलेल्या जमातींना, स्वातंत्र्य पाच वर्षानी उशीरा मिळाले. कांही ठिकाणच्या जमातींना १२ ते १५ - वर्षांनी तारेच्या कुंपणातील सेटलमेंट जेल मधून मुक्त करण्यात आले. **स्वातंत्र्यासाठी लढूनही स्वातंत्र्यसेनानी जमात म्हणून हया जमातीला गौरविण्यात आले नाही. आणि जमातीचे संविधानिक आरक्षणाचा लाभ ही देण्यांत आले नाही.या बाबत हया जमातीवर अन्याय होतो आहे. या बाबत शासन आणि राज्यकर्त्ये, यांनी स्वातंत्र्यासाठी योगदान दिलेल्या हया जमातींचा दखल अद्यापही घेतलेली नाही.**

भटक्या विमुक्त गुन्हेगार जमाती मधील चौदा जमाती बाबत, जन्मतः गुन्हेगार हा कलंक अद्यापही टिकुन आहे. त्या जमाती असे की, - पारधी, राजपारधी , कैकाडी, टकारी-भामटा,व तत्समजाती , बेस्तर, बेरड, कजारभाट, बंजारा, रामोशी, वडार, मांगगारोडी, पामलोर, छप्परबंद,वेडर या जमाती आहेत. अशा या **जमातीत मुलगा,मुलगी जन्माला आले की, ते जन्मापासूनच गुन्हेगार ठरते. हा गुन्हेगारीचा शिक्का, त्याला जन्मभर कपाळावर घेऊन जगावे लागते. समाज त्याच्याकडे गुन्हेगार म्हणूनच पाहते. त्यामुळे माणूसपणच कलंकित होते.** ही मानवतेला काळीमा फासणारी , मानवतेचे अवमुल्यन, अवहेलना करणारी मानसिकता, दृढ झालेली आहे. यासंबंधी चीड-संताप आणि विद्रोह जळजळीतपणे येतो. हया जमातींनी, आदिम-रानटी परंपरा, आजही बाळगुन आहेत. शिकार - मासेमारी जंगल दऱ्याखोऱ्यांशी नाते सांगणारी परंपरा आहे. प्रत्येक जमातींची स्वतंत्र जात पंचायत; आदिम रानटी परंपरेचे ठसठसीत द्योतक आहे.

भटक्या विमुक्त गुन्हेगार जमातींना माणूस म्हणून सन्मानाने आणि प्रतिष्ठेने जगता यावे. त्यांच्यावरील गुन्हेगारीचा शिक्का पुसुन काढता यावा यासाठी, ब्रिटिशांनी गुन्हेगार ठरविलेल्या या जमाती मधील लोकांना, राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात नोकरी देऊन + सन्मानाची वागणूक देउन, विमुक्त गुन्हेगार जमातीच्या जीवनात नवीन पहाट निर्माण केली होती. भटक्या विमुक्त गुन्हेगार जमाती मधील, माणसांना, माणूस म्हणून पोटाशी धरणारा हा ममताप्रीय आणि न्याय प्रिय राजा भटक्या विमुक्त गुन्हेगारजमातींचा प्रेरणास्त्रोत होते. करवीरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी या जमातींच्या मंडळीवर केलेले प्रेम भटकाविमुक्त गुन्हेगार जमाती, चंद्र, सुर्य असे पर्यंत विसरणार नाहीत. त्यांच्या महान कार्याची; विनम्रपणे नोंद हया विमुक्त दिनी घेणे, हे विमुक्त गुन्हेगार जमाती मधील सदस्य कवी- लेखक- साहित्यिक म्हणून मला जाणीव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महामानवांनी आदीवासी करीता संविधान कलम ३४२ अन्वये अनुसुचीत अधिकार दिली आहे . **पण महाराष्ट्र शासनाचे अनुसुची यादीत विमुक्त जमाती नोंद केले असल्याने आदीवासी जमातीचे असूनही, त्याचा लाभ मिळत नाही. ही शासनाची घोडचूक आहे. ही चूक इदाते आयोगाची अम्मलबजावणी केल्यास, कलम ३४२ नुसार विभजांना एस.टी.' व दर्जा देवुन संविधानिक न्याय अंम्मलात आणता येवू शकेल. क्रांतिकारी स्वातंत्र्यसेनानी, आदीवासी वर्गीय, गुन्हेगार जमाती ठरविले गेलेल्या जमातीचा, ३१ ऑगस्ट हा दिवस महत्वाचा ऐतिहासीकदिन आहे. भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या आदिवासी वर्गीय गुन्हेगार जमातीला ,खरे स्वातंत्र्य ३१ ऑगस्ट १९५२ रोजी मिळाल्याने, ३१ ऑगस्ट हा दिवस गुन्हेगार जमातीचा स्वातंत्र्य दिनाचा प्रतिक म्हणून राष्ट्रध्वज**

कर्ता- नागनाथ विठ्ठलराव गायकवाड
21, मैत्रवस्ती, लिम्बेवाडी, वांगी रोड,
सोलापूर. मो. नं. 9850280836

21, मैत्रवस्ती, लिम्बेवाडी, वांगी रोड,
सोलापूर. मो. नं. 9850280836

Scanned with OKEN Scanner

# न्याय देता का न्याय

## कुणी न्याय देता का न्याय, विमुक्त - भटक्यांना न्याय

परकियांनी भारतात घुसखोरी करुन, वतनदार, राजे, सम्राट झाले
आदिवासींना जंगलातून हूसकावून, नदया जमिनीचे हक्क बळकावले
देशाचे मुळ मालक, आज विमुक्तभटके झाले, न्याय मिळेल कां न्याय I

परकियांची गुलामगीरी, आदिवासींनी झिडकारली,स्वाभिमानाने लढली
भिल्लभिमटा रानटी सेना, स्वातंत्र्यासाठी राणाप्रतापाला वज्रासम साथ दिली
हळदीघाटात अकबराला पळविणारी सेना, चोरभामटा झाली हा कसला न्याय II

दगडांना टाके घालणे टकारी जमातीचा व्यवसाय, यांत्रिक युगाने बंद झाली
भिल्लभीम,भिमटा,टकारी, छत्रपती शिवरायाचे मावळे,लढवय्ये बहूमोली
गनिमीकावाचे सेनेस हाकलून, पेशवाइने चोर-भामटा म्हणाली, हा मनुवादी अन्याय III

मोगल, अकबर, बाबर गेले, लंपटपेशवाई, मनुवादी शासक गेले
ब्रिटिश आले १८७१ कायद्याने, गुन्हेगार जमाती म्हणून, जेरबंद केले
स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या जमातीवर, गुन्हेगार म्हणून केलाय अन्याय IV

तोडून काटेरी तारेचे कुंपण, पंतप्रधान नेहरुजीने विमूक्त आम्हास केले
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, आदिवासींना संविधान न्याय घोषित केले
आदिवासींना गुन्हेगारजमात, विभज करुन, नाकारतात संविधानिक न्याय

-------

नागनाथ विठ्ठलराव गायकवाड
२१ भैरुवस्ती, लिमयेवाडी वांगीरोड सोलापूर
मो. नं. ९८५०२८०८३६

Scanned with OKEN Scanner

## उठ रे विमुक्त बांधवा ।

आमची दुनिया निराळी जन्मताच आम्ही गुन्हेगार
ना गाव ना घर जंगल वनांचे हक्क गेले बंद शिकार

रण पंडित लढलो आम्ही गनिमि काव्याने धुर्त फिरंग्याशी
क्षत्रियबाणा लढवय्ये आम्ही लढलो मोगल अन इंग्रजाशी

द्रविडियन संस्कृती मुळ भारतीय आदिवासी जंगल निवासी
निर्वासितांना ही भुमी मिळते देशात आता झालो आम्हीच परदेशी

स्वातंत्र्य मिळवून दिले आम्ही फिरंग्याचे गळयाचे घेवूनी घोटा
आमचे योगदान स्वातंत्र्यात पळविती कोणी आमचा हक्काचा वाटा

गिधाडे मारती अजून टोचा रक्त बंभाळ करती आम्हाला
चटावले आहेत आता ते मढयाच्या टाळूवरील लोणी खाण्याला

म्हणतात कसे युध्द कैदयाच्या जिवनातून मुक्त केले तुम्हाला
तोडूनी काटेरी तारेचे विजभारित कुंपण संशयित गुन्हेगार कलंकिला

गुन्हा कोठे ही होवो कोणही करो अटक आम्हा जमातीला
आदिवासी मुळमालक देशाचे बळी पडती अंधश्रध्दा अन् दंडूकशाहीला

उठ रे विमुक्त बांधवा । गुलामिच्या साखळदंडातून बाहेर ये आता
क्रांतीसुर्याच्या किरणाने साखळदंड गळाली न्यायासाठी संघर्षकर आता

-------

कवी - नागनाथ विठ्ठलराव गायकवाड
२१, भैरुवस्ती , लिमयेवाडी, वांगीरोड , सोलापूर

Scanned with OKEN Scanner

 ISBN : 978-81-937477-0-

प्रस्थापित होण्याऐवजी सार्वत्रिक विषमता वाढीस लागली. लुटारूंच्या टोळ्यांप्रमाणे हाताला लागेल, ते लुटण्यात ही स्वार्थी राजकीय मंडळी व्यस्त झाली. अण्णा भाऊंनी आपल्या अवतीभोवती पसरलेल्या या दांभिक प्रवृत्तीचा आपल्या लोकनाट्यातून बुरखा फाडला. एकूणच मराठी लोकनाट्याच्या इतिहासात अण्णा भाऊ साठे यांच्याइतका सर्वार्थाने लोकनाट्य जगलेला श्रेष्ठ दर्जाचा लोकनाट्यकार व कलावंत मराठी लोकनाट्याला लाभला नाही, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**संदर्भ ग्रंथ :**


१. संपा. आसाराम गायकवाड : 'लोकशाहीर तथा लोकलेखक', अण्णा भाऊ साठे संदर्भ ग्रंथ.

२. डॉ. सदा कऱ्हाडे : 'अण्णा भाऊ साठे, व्यक्तित्त्व आणि कृतित्त्व'.

३. बाबुराव गुरव : 'अण्णा भाऊ साठे, समाजविचार आणि साहित्य विवेचन'.

४. डॉ. रुस्तुम अचलखांब : 'अस्मितादर्श', वार्षिक विशेषांक-२०१२.




Scanned with OKEN Scanner

ISBN : 978-81-937477-0-4


जो व्यापूनी संसाराला। हलवी या भूगोलाला
रुद्ररुपी ज्याची शक्ती। मानव्याची करी जो भक्ती
जो शासित उन्मताला। तोडूनी जुलमी श्रृंखला
तो मी आजी पूजीला'

अशा प्रकारे अण्णा भाऊंनी नशीब व दैववादाऐवजी प्रयत्नवादाचा पुरस्कार केला. जनक्रांतीसाठी श्रमिकांच्या शक्तीचे स्तवन व पूजन केले.

पारंपरिक तमाशातून राजा-राणी, महाराज, सेनापती, प्रधानजी यांसारख्या कल्पनारंजक पात्रांची योजना केली जात असे. राजाचा दरबार म्हटले की, नाचगाणे, शृंगार आणि क्रमाने सोंगाड्याचे अश्लील व पांचट विनोद यांचा खच असे. अण्णा भाऊंनी या साऱ्यांना बगल देऊन गावकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगार, पाटील, पुढारी व भांडवलदार यांसारखी वास्तवातील पात्रे लोकनाट्यात उभी केली. शोषक व शोषित यांच्यातला संघर्ष, काळाबाजार, अन्नधान्य टंचाई, महागाई, दैन्य-दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, निवडणुका, मतदान या वास्तवातल्या विद्यमान प्रश्नांची गुंफण आपल्या लोकनाट्यात केली व परिणामी मूळ तमाशातील दैववादी, श्रद्धावादी, समन्वयवादी, अंधश्रद्धाळू, अतिशयोक्त, शृंगारिक व अध्यात्मप्रवण चौकट बदलली. आपली लोकनाट्ये संपूर्णत: लौकिक, वर्तमानकालीन, जनसामान्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर बेतली. अण्णा भाऊंची लोकनाट्ये विज्ञाननिष्ठ, प्रयत्नवादी, तर्कसंगत व वर्तमानकालीन बहिष्कृतांच्या, श्रमिकांच्या प्रश्नांचे व समस्यांचे व्यासपीठ बनविले. त्यामुळे अण्णा भाऊंचे एकही लोकनाट्य हे ऐतिहासिक व पौराणिक कथानकावर बेतलेले नाही, हे आपल्या लक्षात येते. तर आपल्या समकालीन बहुजनांच्या, अस्पृश्यांच्या ज्वलंत सामाजिक व राजकीय समस्यांच्या सोडवणुकीसाठी जनसामान्यांनी दिलेला निकराचा लढा, हे अण्णा भाऊंच्या लोकनाट्याचे विषय झाले. यांमधून शेतकरी, शेतमजूर, गिरणीकामगार हे त्यांच्या लोकनाट्याचे नायक झाले.

अण्णा भाऊंच्या लोकनाट्यातील कथानक व पात्रे ही काल्पनिक पातळीवरची नसून, वास्तवातली आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवघ्या काही वर्षांत स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आपल्या व्यक्तिगत आयुष्याची राखरांगोळी करणाऱ्या, जिवाची बाजी लावणाऱ्या सच्च्या स्वातंत्र्यसैनिकांची पिढी भारताच्या राजकीय क्षेत्रातून अस्तंगत झाली व राजकीय पटलावर स्वार्थी, लोभी, ढोंगी व दांभिक भ्रष्टाचारी पुढाऱ्यांचा उदय झाला. त्याग, निष्ठा, श्रद्धा ही मूल्ये नाहीशी झाली. या राजकारणी मंडळींनी समाजातील पीडितांच्या, बहिष्कृतांच्या, श्रमिकांच्या बाजूने उभे न राहता, धनदांडग्यांची बाजू घेतली. परिणामी, स्वातंत्र्योत्तर काळात समता, न्याय, बंधुभाव



Scanned with OKEN Scanner

 ISBN : 978-81-937477-

जाहिरनामा, पक्षाचा कार्यक्रम, कार्यपद्धती याच्यावर टीका केली. काँग्रेस हे भांडवलशाहीचे प्रतीक आहे, हा पक्ष भांडवलशाहीची सगळी धोरणे राबविते, म्हणून काँग्रेसविरुद्धचा हा लढा भांडवलशाहीच्या शोषणाविरुद्धचा अण्णा भाऊंचा लढा आहे. तर 'मूक मिरवणूक' व 'पुढारी मिळाला' या लोकनाट्यांतून समाजवादी पक्ष व कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यपद्धती व ध्येयधोरणांची तुलना करून कम्युनिस्ट पक्षाची अण्णा भाऊंनी विशद केलेली जनसंघर्षवादी भूमिका प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते. 'माझी मुंबई' या लोकनाट्यातून विष्णू नावाचा मुंबईतला कामगार आणि मुरारीशेठ हा गुजराथी माणूस या दोघांमध्ये 'मुंबई कुणाची' या विषयावर झालेला वादविवाद मांडला आहे. यामधून अण्णा भाऊंनी मुंबई महाराष्ट्राचीच कशी आहे, हे पटवून दिले आहे. 'अकलेची गोष्ट', 'खापऱ्या चोर', 'बिलंदर बुडवे', 'पेंग्याचं लग्न' आणि 'दुष्काळात तेरावा महिना' या लोकनाट्यांचे विषय, आशय व संदर्भ फार व्यापक स्वरूपाचे आहेत.

अण्णा भाऊंची सगळीच लोकनाट्ये तुफान लोकप्रिय ठरली. कारण अण्णा भाऊ लोकनाट्याच्या लेखनाबरोबरच अभिनयही करत असत. लेखक, दिग्दर्शक, निर्माता, अभिनेता, शाहीर अशा सर्व अंगांनी लोकनाट्य जगलेला लोकशाहीर अण्णा भाऊंशिवाय महाराष्ट्रात दुसरा सापडणे दुर्मीळ आहे. अण्णा भाऊ म्हणतात की, ''माणसाला पोटाच्या भुकेबरोबरच सांस्कृतिक भूकही असते. ही भूक भाकरीने नव्हे तर मनोरंजनाने भागविली जाते. मराठी मातीतल्या रांगड्या गड्यांची ही भूक महार, मांग कलावंतांनी निर्माण केलेल्या 'तमाशा' या लोकरंगभूमीने भागविण्याचे फार मोठे कार्य केले आहे.'' अण्णा भाऊंची लोकनाट्ये लोकरंजनाबरोबरच लोकशिक्षणाचे कार्य करतात. कारण ही सगळीच लोकनाट्ये समाजपरिवर्तन व समाजप्रबोधनाच्या गरजेतून जन्माला आली आहेत. यामध्ये गोरगरिबांबद्दलचा जिव्हाळा, कामगार, शेतमजुरांना धनदांडग्यांकडून होणाऱ्या पिळवणुकीविरुद्ध श्रमिकास संघर्षास उद्युक्त करण्याची प्रवृत्ती आपल्या सहज लक्षात येते. अण्णा भाऊंनी पारंपरिक तमाशाचा आशय, आविष्कार व रचनातंत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून परंपरागत तमाशाचा चेहरा बदलला. कारण तमाशा हा कलाप्रकार केवळ मनोरंजनाची व रंगविलासाची कला मानली जात होती. त्यामुळे या कलेला सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. साठेंनी परंपरागत तमाशातील गण, गौळण व बतावणी या प्रकारांना बगल दिली. गणातील 'गणेश' या देवतेची स्तवन करण्याची प्रथा मोडीत काढून महाराष्ट्र, मायभूमी, भारतभूमी यांबरोबरच श्रमिकांच्या शक्तीचे नमन व पूजन करणारे गण रचले.

'प्रारंभी आजला। कर त्याचा आम्ही पूजीला

ISBN : 978-81-937477-0-4


मोरारजी देसाई यांनी 'तमाशा' या लोककलाप्रकारावर बंदी घातली. या संकटातून मार्ग काढण्यासाठी चाणाक्ष व चतुर असणाऱ्या अण्णा भाऊंनी 'वगनाट्या'ऐवजी 'लोकनाट्य' असा शब्दप्रयोग केला. यासंदर्भात पां. तु. पाटणकर म्हणतात, ''मोरारजी देसाईंनी अण्णा भाऊंच्या कलापथकावर व तमाशावर बंदी आणली. अण्णा भाऊंनी डोके लढवले त्यांनी 'माझी मुंबई' हा वग लाखो कामगारांसमोर सादर केला व सुरुवातीला स्टेजवरून जाहीर केले की, 'मायबाप सरकारने तमाशावर बंदी आणली आहे. म्हणून आज आम्ही आपल्यासमोर 'माझी मुंबई' हे लोकनाट्य सादर करीत आहोत.' टाळ्यांच्या कडकडाटात व पोलिसांच्या उपस्थितीत 'तमाशा'चे 'लोकनाट्य' असे बारसे करण्याचे ऐतिहासिक कार्य अण्णा भाऊंनी केले.'' यावरून 'लोकनाट्य' या शब्दप्रयोगाच्या जनकत्त्वाचा मान नि:संकोचपणे अण्णा भाऊंनाच द्यावा लागतो.

वर उल्लेख केल्याप्रमाणे परंपरागत 'तमाशा' हा लोककलाप्रकार बहिष्कृत समाजगटात निर्माण झाला असल्यामुळे, यामध्ये काम करणारे बहुसंख्य कलावंत हे अस्पृश्यवर्गातून आलेले होते. या कलावंतांनी तमाशावरील बंदीविरोधात लढा देण्यासाठी 'मुंबई इलाखा ढोलकी संघा'ची स्थापना केली. या संघटनेतील काही मंडळींनी १९ सप्टेंबर १९४७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट घेऊन तमाशा कलावंतांवर उपासमारीची वेळ आल्याची कैफियत सांगितली.
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांचे म्हणणे आस्थेवाईकपणे ऐकूण घेतले व आपल्या चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते बापुसाहेब राजभोग यांना शिष्टमंडळासह मोरारजी देसाईंची भेट घेण्याची सूचना केली. या भेटीनंतर तमाशातून अश्लील प्रसंग दाखविले जाऊ नयेत आणि कोणत्याही धर्माच्या भावना दुखावल्या जातील, अशा प्रकारचे संवाद वापरले जाऊ नयेत, या दोन अटींवर तमाशावरील बंदी मागे घेण्यात आली. नंतरच्या काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पार्श्वभूमीवर लिहिलेल्या, 'माझी मैना गावावर राहिली' या लोकप्रिय लावणीतून अण्णा भाऊंनी मोरारजी देसाईंवर हल्ला चढवला, हे सर्वश्रुत आहे.

अण्णा भाऊंनी 'अकलेची गोष्ट' हे पहिले लोकनाट्य १९४५ च्या अखेरीस लिहिल्याची नोंद आढळते, तर या लोकनाट्याचा 'लाल बावटा' कलापथकाद्वारे १९४६ ला रंगमंचावरून प्रयोग झाला. त्यानंतर अण्णा भाऊंनी एका मागोमाग एक अशी पंधरा दर्जेदार लोकनाट्ये लिहिली. या लोकनाट्यांनी १९४५ ते १९६२ या काळात जनमानसावर प्रभाव गाजविला. कारण या लोकनाट्याच्या विषयाला व आशयाला त्या काळाचे संदर्भ आहेत. 'देशभक्त घोटाळे', 'बेकायदेशीर', 'लोकमंत्र्याचा दौरा' या लोकनाट्यांतून अण्णा भाऊंनी तत्कालीन कॉंग्रेस पक्षाचा

# लोकनाट्याचे जनक : अण्णा भाऊ साठे

डॉ. भास्कर विठ्ठलराव नरवाडे
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर.

प्रत्येक सामाजिक स्तराच्या काही विशिष्ट कला असतात. त्या विशिष्ट समाजस्तरात निर्माण होऊन विकसित होत असतात. त्या कलांची काही खास वैशिष्ट्ये असतात. 'तमाशा' हा कलाप्रकार असाच भारतीय वर्णव्यवस्थेच्या तळस्तरात निर्माण झालेला कलाप्रकार आहे. मराठी मुलखात राहणाऱ्या महार आणि मांग जातीत जन्मलेल्या अनेक तमासगिरांनी या कलाप्रकारात वापरल्या जाणाऱ्या विविध वाद्यांचे ताल आणि ठेके स्वत:च्या प्रतिभेने निर्माण केले. त्यासाठी त्यांनी कोणाची नक्कल केली नाही. महाराष्ट्राचे प्रमुख सांस्कृतिक अंग असणाऱ्या लावणीची खटकेबाज व सफाईदार चाल आणि ढोलकीच्या ठेक्याचे बोल त्यांच्याच मेंदूतून जन्माला आले. तेच त्यांचे गुरु व तेच त्यांचे चेले. तमाशातील ढोलकी, झांज, तुणतुणे, हलगी यांसारखी अनेक वाद्ये त्यांनीच निर्माण केली व त्यांचे स्वत:चे शास्त्रही निर्माण केले; पण मनुस्मृतीच्या राज्यात त्यांना ज्ञानसंचय करण्यास बंदी असल्या कारणाने हे शास्त्र त्यांना कागदावर उतरविता आले नाही. याच सामाजिक स्तरात जन्मलेल्या अण्णा भाऊ साठेंनी परंपरागत 'तमाशा' या कलाप्रकाराला काळ व परिस्थितीनुसार नवे रूप दिले. ते रूप म्हणजेच आज सर्वपरिचित आणि सर्वप्रिय असणारे 'लोकनाट्य' हे होय.

'तमाशा' या कलाप्रकाराचा आधुनिक अवतार असणाऱ्या लोकनाट्याचे दालन समकालीन मराठी साहित्यात समृद्ध व संपन्न असलेले दिसून येते. 'लोकनाट्य' या शब्दप्रयोगाच्या जनकत्त्वाचा मान अण्णा भाऊ साठेंनाच द्यावा लागतो. कारण 'लोकनाट्य' हा शब्द महाराष्ट्रात सर्वप्रथम अण्णा भाऊंनीच रुजविला व वाढविला. पारंपरिक तमाशातील वगनाट्यासाठी लोकनाट्य हा शब्द वापरण्यामागे मोठा इतिहास आहे. परंपरागत वगनाट्यातून हिंदूंच्या देवता विशेषत: कृष्णाची टिंगलटवाळी व विडंबन केले जाते, असा आरोप सनातन्यांचे माहेरघर असणाऱ्या पुण्यातील दत्ता बाळ नावाच्या एका परंपरावाद्याने केला. दत्ता बाळ यांच्या सांगण्यावरून तत्कालीन गृहमंत्री

(आंबेडकरी जलसा), लोकनाट्य - अण्णाभाऊ साठे - खापऱ्या चोर

अण्णाभाऊंचे एकूण साहित्य
कथा, कादंबरी, लावणी, पोवाडे, नाटक

* लोकनाट्य - या शब्दात नाट्य (लोकांचे नाट्य) लोक असे आपण म्हणतो. लोक म्हणजे समूह इंग्रजीत Folk ही संज्ञा बहुजनासाठी आपल्याकडे वापरली जाते.

* नागरी आणि नांगरी संज्ञा आहेत नागरी हा शहरात राहणारा वर्ग नांगरी हा ग्रामीण कष्टकरी, शेतकरी, श्रमिक असा बहुजन समाज

14 कथासंग्रह
35 कादंबऱ्या
3 नाटके
13 लोकनाट्ये
10 पोवाडे

* लोककथा — लोकगीत - लोकवाङ्मय - लोकनाट्य - पूर्वी याला तमाशा म्हणून बदनाम केले (बंद करा तमाशा काय लावलाय) अण्णाभाऊंनी याला समृद्ध केले

* नाटक - अभिजन लोकनाट्य - बहुजन कष्टकरी कामगार मजूर श्रमिक 18 पगड जाती जमाती कष्टकरी संस्कृतीशी जोडला आहे. त्यांचे रंजन व्हावे म्हणून 'लोककला'

* लावणी — पोवाडा — उसाचा फड - राजकारणाचा फड, कुस्त्यांचा फड, तमाशाचा फड आहे

* तमाशाचा फड ज्ञानेश्वरी महानुभाव वाङ्मयात पहावयास मिळतो कष्ट, श्रमिक, रंजन करणे लोकनाट्य - रंजनाशी निगडीत

* अण्णाभाऊंनी या कलेचे स्वरूप बदलले. तमाशाचे स्वरूप बदलून लोकनाट्य नाव धारण केले.

* अकलेची गोष्ट 1946 शेतकरी, गावचा सावकार हुशार असतो अण्णाभाऊंनी बंड्या गावकीची भूमिका केली.

* देशभक्त घोटाळे, कामगार विजय, बिलंदर बुडवे, पुढारी मिळाला, लोकमंत्र्याचा दौरा, पेंग्याचे लगीन. लोकनाट्यांशी नावे जोडली आहेत

Scanned with OKEN Scanner